# गट इ – इ. ५ वी व ६ वी

**शुका सारिखे पूर्ण वैराग्य ज्यांचे । वसिष्ठापरि ज्ञान योगेश्वराचे ।**
**कवि वाल्मिका सारिखा मान्य ऐसा। नमस्कार माझा सद्‌गुरू रामदासा ।।**

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा।
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा।
गमू पंथ आनंत या राघवाचा ।।१।।

मना सज्ज्ना भक्तिपंथेचि जावें।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें।
जनीं निंद्य तें सर्व सोडोनि द्यावें।
जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ।।२।।

प्रभाते मनीं राम चिंतीत जावा।
पुढें वैखरीं राम आधीं वदावा।
सदाचार हा थोर सांडू नये तो।
जनीं तोचि तो मानवीं धन्य होतो ।।३।।

मना वासना दुष्ट कामा नये रे।
मना सर्वथा पापबुद्धी नको रे।
मना धर्मता नीति सोडूं नको हो।
मना अंतरी सार वीचार राहो ।।४।।

मना पापसंकल्प सोडोनि द्यावा।
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा।
मना कल्पना ते नको वीषयांची।
विकारें घडे हो जनीं सर्व ची ची ।।५।।

नको रे मना क्रोध हा खेदकारी।
नको रे मना काम नानाविकारी।
नको रे मना लोभ हा अंगिकारूं।
नको रे मना मत्सरू दंभभारू ।।६।।

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें।
मना बोलणें नीच सोशीत जावें।
स्वयें सर्वदा नम्र वाचें वदावें।
मना सर्व लोकांसि रे नीववावें ।।७।।

देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी।
मना सज्ज्ना हेचि क्रीया धरावी।
मना चंदनाचे परी त्वा झिजावें।
परी अंतरीं सज्ज्ना नीववावें ।।८।।

नको रे मना द्रव्य तें पूढिलांचे।
अती स्वार्थबुद्धी न रे पाप सांचे।
घडे भोगणे पाप तें कर्म खोटें।
न होतां मनासारिखें दुःख मोठें ।।९।।

सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी।
दुखाची स्वयें सांडी जीवीं करावी।
देहेदुख तें सूख मानीत जावें।
विवेकें सदा सस्वरूपी भरावें ।।१०।।

जनीं सर्व सूखी असा कोण आहे?।
विचारे मना तूंचि शोधूनि पाहे।
मना त्वां चि रे पूर्व संचीत केलें।
तयासारिखें भोगणें प्राप्त झालें ।।११।।

मना मानसीं दुःख आणूं नको रे।
मना सर्वथा शोक चिंता नको रे।
विवेके देहेबुद्धि सोडूनि द्यावी।
विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ।।१२।।

मना सांग पां रावणां काय जालें।
अकस्मात तें राज्य सर्वे बुडालें।
म्हणोनी कुडी वासना सांडि वेगीं।
बळे लागला काळ हा पाठिलागीं ।।१३।।

जिवां कर्मयोगें जनी जन्म जाला।
परी सेवटीं काळमूखी निमाला।
महाथोर ते मृत्युपंथेंचि गेले।
कितीयेक ते जन्मले आणि मेले ।।१४।।

मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी।
जितां बोलती सर्वही जीव मी मी।
चिरंजीव हे सर्वही मानिताती।
अकस्मात सांडूनिया सर्व जाती ।।१५।।

मरे येक त्याचा दुजा शोक वाहे।
अकस्मात तोही पुढें जात आहे।
पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्यातें।
म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतें ।।१६।।

मनीं मानव वेर्थ चिंता वाहातें।
अकस्मात होणार होऊनि जातें।
घडे भोगणे सर्वही कर्मयोगें।
मतीमंद ते खेद मानी वियोगें ।।१७।।

मना राघवेवीण आशा नको रे।
मना मानवाची नको कीर्ति तूं रे।
जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें।
तया वर्णितां सर्वही श्लाघ्यवाणें ।।१८।।

मना सर्वथा सत्य सांडू नको रे।
मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे।
मना सत्य तें सत्य वाचें वदावें।
मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें ।।१९।।

बहू हिंपुटी होइजे मायपोटीं।
नको रे मना यातना तेचि मोठी।
निरोधें पचे कोंडिलें गर्भवासीं।
अधोमूख रे दुख त्या बाळकासी ।।२०।।

मना वासना चूकवी येरझारा।
मना कामना सांडिं रे द्रव्यदारा।
मना यातना थोर हे गर्भवासी।
मना सज्ज्ना भेटवीं राघवासी ।।२१।।

मना सज्ज्ना हीत माझें करावें।
रघूनायका दृढ चित्तीं धरावें।
महाराज तो स्वामि वायूसुताचा।
जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा ।।२२।।

न बोलें मना राघवेवीण कांही।
जनीं वाउगें बोलतां सूख नाही।
घडीनें घडी काळ आयुष्य नेतो।
देह्यान्तीं तुला कोण सोडूं पहातो? ।।२३।।

रघूनायकावीण वायां सिणावें।
जनासारिखें वेर्थ कां वोसणावें?।
सदासर्वदा नाम वाचें वसों दे।
अहंता मनीं पापिणी ते नसों दे ।।२४।।

मना वीट मानूं नको बोलण्याचा।
पुढें मागुता राम जोडेल कैचा।
सुखाची घडी लोटतां सूख आहे।
पुढें सर्व जाईल कांही न राहे ।।२५।।

देहे रक्षणाकारणें यत्न केला।
परी सेवटीं काळ घेऊनि गेला।
करीं रे मना भक्ति या राघवाची।
पुढें अंतरीं सोडिं चिंता भवाची ।।२६।।

भवाच्या भये काय भीतोसी लंडी।
धरीं रे मना धीर धाकासि सांडी।
रघूनायकासारिखा स्वामी शीरीं।
नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ।।२७।।

दिनानाथ हा राम कोदंडधारी ।
पुढे देखता काळ पोटीं थरारी।
जना वाक्य नेमस्त हे सत्य मानी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।२८ ।।

पदी राघवाचे सदा ब्रीद गाजे।
बळें भक्तरीपूशिरीं कांबि वाजे।
पुरी वाईली सर्व जेणें विमानीं।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।२९।।

समर्थाचिया सेवका वक्र पाहे।
असा सर्व भूमंडळी कोण आहे ?।
जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३०।।

महा संकटी सोडिले देव जेणें ।
प्रतापे बळें आगळा सर्व गूणें।
जयातें स्मरे शैलजा शूळपाणी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३१।।

अहल्या शिळा राघवें मुक्त केली।
पदीं लागतां दिव्य होऊनि गेली।
जया वर्णितां सीणली वेदवाणी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३२।।

वसे मेरुमांदार हे सृष्टीलीळा।
शशी सूर्य तारांगणे मेघमाळा।
चिरंजीव केले जनीं दास दोन्ही।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३३ ।।

उपेक्षा कदा रामरूपी असेना।
जिवा मानवां निश्चयो तो वसेना।
शिरीं भार वाहेन बोले पुराणीं।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३४।।

असे हो जया अंतरी भाव जैसा।
वसे हो तया अंतरीं देव तैसा।
अनन्यास रक्षीतसे चापपाणी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३५।।

सदा सर्वदा देव सन्नीध आहे।
कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे।
सुखानंद आनंद कैवल्यदानी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३६।।

सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा।
उडी घालितो संकटीं स्वामी तैसा।
हरीभक्तिचा घाव गाजे निशाणीं।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३७।।

मना प्रार्थना तूजला येक आहे।
रघूराज थकीत होऊनि पाहे।
अवज्ञा कदा हो येदर्थी न कीजे।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।३८।।

जया वर्णिती वेदशास्त्रेंपुराणें।
जयाचेनि योगें समाधान बाणें ।।
तयालागी हें सर्व चांचल्य दीजे।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।३९।।

मना पाविजे सर्वही सूख जेथें।
अती आदरे ठेविजे लक्ष तेथें।
विवेकें कुडी कल्पना पालटीजे।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।४०।।

बहू हिंडतां सौख्य होणार नाही।
सिणावें परी नातुडे हीत कांही।
विचारें बरें अंतरा बोधवीजे।
मना सज्जना राघवीं वस्ति किजे ।।४१।।

बहूतांपरी हेंचि आतां धरावें।
रघूनायेका आपुलेंसें करावे।
दिनानाथ हें तोडरीं ब्रीद गाजे।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।४२।।

मना सज्जना येक जीवीं धरावें।
जनीं आपुलें हीत तूवां करावें।
रघुनायेकावीण बोलों नको हो।
सदा मानसीं तो निजध्यास राहो ।।४३।।

मना रे जनीं मौन्यमुद्रा धरावी।
कथा आदरें राघवाची करावी।
नसे राम तें धाम सोडूनि द्यावें।
सुखालागीं आरण्य सेवीत जावें ।।४४।।

जयाचेनि संगे समाधान भंगे।
अहंता अकस्मात येऊनि लागे।
तये संगतीची जनीं कोण गोडी।
जये संगतीनें मती राम सोडी ।।४५।।

मना जे घडी राघवेवीण गेली।
जनीं आपुली ते तुवां हानि केली।
रघुनायेकावीण तो सीण आहे।
जनीं दक्ष तो लक्ष लाऊनि पाहे ।।४६।।

मनीं लोचनीं श्रीहरी तो चि पाहे।
जनीं जाणता भक्त होऊनि राहे।
गुणीं प्रिति राखे क्रमू साधनाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४७।।

सदा देवकाजी झिजे देह ज्याचा।
सदा रामनामें वदे नित्य वाचा।
स्वधर्मे चि चाले सदा उत्तमाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४८।।

सदा बोलण्या सारिखें चालताहे।
अनेकीं सदा येक देवासि पाहे।
सगूणी भजे लेश नाही भ्रमाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४९।।

नसे अंतरीं कामकारी विकारी।
उदासीन जो तापसी ब्रह्मचारी।
निवाला मनीं लेश नाहीं तमाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५०।।

मनाची शतें ऐकतां दोषं जाती।
मतीमंद ते साधना योग्य होती।
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य आंगी।
म्हणे दास विश्वासता मुक्ति भोगी ।।२०५।।

वरील श्लोकांची ऑडीओ व्हीज्युल लिंक - https://youtu.be/DGYEeKrSoIc